(114)

१०) रेखांकनामध्ये भुखंड क्र.२७,२८,२९,३०,३१ बाबत आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/अल्प उत्पन्न गटातील (LIG) लोकांसाठी व मध्यम उत्पन्न गटातील लोकांसाठी (MIG) नियोजित केलेल्या भूखंडाची विक्री त्या त्या गटातील. लोकाना करणे अर्जदार यांना बंधणकारक राहील.उपविभुखंडापैकी किमान ४ व कमाल ६भुखंडामध्ये रो हाऊसेस पध्दतीने बांधकाम अनुज्ञेय आहे.भविष्यात कोणतीही तक्रार उदभवल्यास त्यांची जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

११) नियोजित केलेल्या भूखंडात प्रस्तावित केलेले रेखांकना संदर्भात वर उल्लेखिलेल्या शर्तीची पूर्तता करणेत आले नंतरच भूखंडधारकांना जिल्हाधिकारी यांचेकडून बांधकाम परवानगी अनुज्ञेय राहील. या आदेशाने देण्यांत आलेली रेखांकन मंजूरी व बिनशेती परवागनी म्हणजे नियोजित भूखंडात बांधकामे अनुज्ञेय असा नसून भूखंड धारकांनी स्वतंत्ररित्या बांधकाम नकाशे मंजूर करुन घेणे आवश्यक आहे.

१२) सदर जमिनीतील वृक्षांची तोड असल्यास करावयाची झाल्यास अर्जदारांना सक्षम वन/महसुल अधिका-यांच्या पूर्वपरवानगी कायदयाने बंधनकारक राहील.

१३) सदर जागेत अनधिकृतरित्या गौणखनिज उत्खनन करण्यास अर्जदार यांना मनाई आहे. कायदयानुसार आवश्यक त्या परवानग्या घेणे अर्जदार यांना बंधणकारक राहील.

१४) अर्जदार यांचेवर प्रचलित पर्यावरण आरोग्य व तत्सम कायदयाचे पालन करणे बंधणकारक राहील

१५) पोच रस्त्याखालील क्षेत्राचे आकारफोडपत्रक झाल्याशिवाय रेखांकनातील निवासी भूखंडात बांधकाम परवानगी अनुज्ञेय नाही.

१६) अर्जदार यांनी सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास अगर मंजूर रेखांकनात फेर बदल केलेचे आढळून आल्यास देणेत आलेली परवागनी आपोआप रद्द होईल.

सही/-अजित पवार
अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

प्रत -

१) श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली यांजकडे मंजूर रेखांकन नकाशासह.
२) तहसीलदार दापोली यांजकडे मंजूर रेखांकन नकाशासह योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
३) उपअधिक्षक, भूमि अभिलेख दापोली यांजकडे मंजूर रेखांनासह रवाना.

२/- सदरच्या मंजूर रेखांकन नकाशाप्रमाणे दुरुस्त आकारफोड पत्रक तयार करुन त्याचा अंमल गांव कागदी देण्यासाठी तहसीलदार दापोली यांजकडे पाठविण्यांत यावे.

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी.

परिशिष्ट

मौजे चिखलगांव ता.दापोली येथील ग.ट.नं.३९८,३९९ मध्ये निवासी भूखंडाचे रेखांकनातील क्षेत्राचा तपशिल दर्शविणारे पत्रक.

अ.क्र.	भूखंड क्रमांक	हि.नं	भूखंडाचे क्षेत्र हे.आर
१	१	३९८/१	०.०३.५०
२	२	३९८/२	०.०२.६९
३	३	३९८/३	०.०२.६९
४	४पैकी	३९८/४	०.००.६५
५	अंतर्गत मार्ग	३९८/५	०.०५.२५
६	७	३९८/६	०.०२.६२
७	६	३९८/७	०.०२.६१
८	८	३९८/८	०.०३.८३
९	९	३९८/९	०.०३.२७
१०	खुलेक्षेत्र	३९८/१०	०.०४.७०
११	अंतगत मार्ग	३९८/११	०.०३.९३
१२	१७ पैकी	३९८/१२	०.०१.२६
१३	४पैकी	३९९/१	०.०१.६७
१४	५	३९९/२	०.०२.६१
१५	अतर्गत मार्ग	३९९/३	०.४७.०७
१६	१०	३९९/४	०.०२.२५
१७	११	३९९/५	०.०२.८५.
१८	१२	३९९/६	०.०२.८५
१९	१३	३९९/७	०.०२.७९
२०	१७ पैकी	३९९/८	०.०२.३०
२१	१८	३९९/९	०.०३.१०
२२	१९	३९९/१०	०.०३.१०
२३	खुले क्षेत्र	३९९/११	०.१३.३०
२४	२०	३९९/१२	०.०३.१०
२५	१४	३९९/१३	०.०२.९४
२६	१५	३९९/१४	०.०२.९५
२७	१६	३९९/१५	०.०२.६५
२८	२१	३९९/१६	०.०२.८१
२९	२२	३९९/१७	०.०२.४९
३०	२३	३९९/१८	०.०२.४९
३१	२४	३९९/१९	०.०२.०१
३२	२५	३९९/२०	०.०२.००
३३	२६	३९९/२१	०.०२.००
३४	२८ (EWS LIg)	३९९/२२	०.०२.९३
३५	२९ (EWS LIg)	३९९/२३	०.०४.९२
३६	२७ (MIG)	३९९/२४	०.१०.३७
३७	३० (EWS LIg)	३९९/२५	०.१०.००
३७	३१ (EWS LIg)	३९९/२६	०.०३.४५
		एकूण	१.७८.००

(112)

१	भूखंड क्रमांक १ ते २६	०.७२.०८
२	मोकळे क्षेत्र	०.१८.००
३	एलआयजी क्षेत्र	०.२१.३०
४	एमआयजी क्षेत्र	०.१०.३७
५	अंतर्गत रस्त्याखालील क्षेत्र	०.५६.२५
	एकुण क्षेत्र	**१.७८.००**

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

(अजित पवार)
अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

क्र.म.शा.का.६/एल.एन.ओ/एसआर/तह/१९२/२/१२
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी दिनांक - ३०/०१/२०१३

वाचले :

१) **महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४.**
२) **श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली** यांचा **दिनांक ७/६/२०१२** चा अर्ज.
३) **तहसीलदार दापोली** यांचेकडील पत्र **क्र. एलएनए/कावि/३५/१२ दिनांक ११/०१/२०१३** ने झालेला चौकशी अहवाल.
४) **नगर रचनाकार रत्नागिरी** यांचेकडील **जा.क्र. रेखा/चिखलगांव/नरर/१३०, दि.२२/१/२०१३ चे शिफारस** पत्र.

प्रस्तावना :

मौजे चिखलगांव ता. दापोली ग.ट नं.३९९ व ३९८ मधील १.७८.००हे.आर.**क्षेत्र** असलेली जमीन **श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली** यांचे वहीवाटी खालील आहे. **श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली** यांनी सदर जमिनीपैकी १.७८.०० हे.आर क्षेत्रापैकी १.०३.७५ **हे.आर.** क्षेत्रात निवासी रेखांकन या अकृषिक कारणासाठी परवानगी मिळणे संदर्भात अर्ज दाखल केला आहे.

या अर्जा कामी केलेल्या चौकशीत असे आढळून येते की,

१) सदर जमीनीचा अर्जदार स्वतः वहिवाटधारक आहे.

२) सदर जमिन संपादीत नाही अगर शासकीय किंवा सार्वजनिक उपयागासाठी नजिकच्या काळात संपादन होण्याची शक्यता नाही.

३) सदर जमिन विभागीय-विकास योजनेत किंवा नगर विकास योजनेत कोणत्या विशिष्ट कारणासाठी राखून ठेवलेली नाही आणि संबंधित अधिका-यांकडून सदर जमिन निवासी व वापरास अनुज्ञेय असल्याबाबत नगररचनाकार रत्नागिरी यांनी अहवाल **क्र १३०, दिनांक २२/१/२०१३** नुसार शिफारस केली आहे.

४) निवासी रेखांकन या अकृषिक कारणासाठी उपयोगात आणण्यास स्वच्छता व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टितून सदर जमीन योग्य आहे.

५ नगर रचनाकार यांचा चौकशी अहवाल **क्र१३०, दिनांक २२/१/२०१३**नुसार सदर प्रकरणी प्रस्तावित बिनशेती वापर अनुज्ञेय आहे.

६) अर्जदाराने हजर केलेला आराखडा-इमारतीचा नकाशा महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या उपयोगाचे रुपांतर व बिनशेती दस्त) नियम १९६९ समवेत जोडलेल्या परि.२ व ३ मधील तरतुदीची सुसंगत आहे.

७) नियोजित इमारती पासून १५ मीटर पेक्षा कमी अंतरावरुन उच्च दाबाची विघुत वाहीनी जात नाही.

८) अर्जदाराने ज्या अटींवर बिनशेती परवानगी देणेत येईल त्या पाळणेचे मान्य केले आहे.

९) नियोजित बिनशेती क्षेत्र प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात समाविष्ट नसल्याबाबत सक्षम अधिका-याचा अभिप्राय घेण्यात आला आहे.

१०) नियोजित इमारतीच्या बांधकामामुळे पथकिनारवर्ती नियमांचा भंग होत नाही

११) प्रस्तावित बांधकामामुळे केंद्र शासनाचे पर्यावरण व वन विभागाचे दिनांक १९ फेब्रुवारी १९९१ चे अधिसूचनेच्या तरतूदींचा भंग होत नसल्याची खात्री करणेत आली आहे.

१२) **तहसीलदार दापोली** यांचेकडील पत्र **क्र. एलएनए/कावि/३५/१२ दिनांक ११/१/२०१३** नुसार मंडळ अधिकारी बुरोंडी यांचे चौकशी अहवालावरुन सदर परवानगी देणे बाबत शिफारस करण्यांत आली आहे.

उपरोक्त चौकशीच्या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे बिनशेती परवानगी आदेश पारीत करण्यांत येत आहे.

आदेश :-

जिल्हाधिकारी यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील ४४ व्या कलमानुसार प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन अर्जदार **श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली** यांनी **मौजे** चिखलगांव ता. दापोली ग.ट नं.३९९ व ३९८ मधील १.७८.००हे.आर. **.क्षेत्र** मधील जमिनीपैकी १.०३.७५ **चौ.मी.** क्षेत्रात **निवासी रेखांकन** या अकृषिक कारणांसाठी वापर करणेस याव्दारे खालील शर्तीवर परवानगी देण्यांत येत आहे.

१) एकूण १.७८.०० **हे.आर**. क्षेत्रापैकी १.०३.७५ हे.आर क्षेत्रात **निवासी रेखांकन** करावयाचे असून आहे.रस्त्याकडे ०.**५६.२५ हे.आर** वर्ग होणार आहे.

२) देण्यात येत असलेली परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्यासाठी केलेल्या नियमांतील तरतुदीच्या आधिन राहून देण्यांत आलेली आहे.

३) भूखंडाची उपविभागणी करावयाची झाल्यास महसूल खात्याची परवानगी घेणे आवश्यक आहे.

४) रेखांकनातील भूखंडामध्ये बांधकाम करणेपूर्वी इमारत विषयक तपशिलवार बांधकाम नकाशे महसूल खात्याकडून मंजूर करून घेणे संबधीत भूखंडधारकावर बंधनकारक आहे.

५) ज्या कारणाकरीता परवानगी देण्यात आली आहे त्या कारणाकरिताच सदर जमिनीचा उपयोग करावा. त्या क्षेत्राचा किंवा त्यापैकी काही भागाचा परवानगी देण्यात आलेल्या कारणा व्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता कामा नये.

६) परवानाधारकाने इमारतीचा आराखडा सक्षम अधिका-याकडून जेथे इमारतीचे नियंत्रण ज्याचे अधिक्षेत्रात येत असेल तेथे मंजूर करुन घेतला पाहीजे आणि इतर प्रकरणात त्यांने इमारती आराखडे महाराष्ट्र जमिन महसूल नियम (जमिनीच्या उपयोगाचे रुपांतर आणि बिनशेती दस्त) १९६९ मधील परिशिष्ट २ व ३ मधील तरतुदीचे काटेकोरपणे पालन करुन तयार केले पाहीजेत आणि ते जिल्हाधिकारी यांचेकडून मंजूर करुन घेतले पाहिजेत व मंजूर आराखडयानुसार बांधकाम केले पाहीजे.

७) ज्या करिता परवानगी देण्यात आली आहे त्या कारणाकरिता सदर जमिनीचा निवासी रेखांकनाचा उपयोग सुरु होण्याच्या तारखेपासून परवानगीधारकाने दर चौ.मी. **१०** पैसे. या दराने १.०३.७५ हे.आर क्षेत्राची निवासी बिनशेती दस्त दिला पाहिजे जमिनीचा उपयोगात बदल होते वेळी जरी पूर्वी आकारण्यात आलेल्या बिनशेती दस्ताची मुदत संपली असली तरी ते विचारात न घेता बिनशेती दस्त निराळया दराने आकारला जाईल.

८) रेखांकनातील जमिनीमध्ये नैसर्गिक सांडपाणी व पावसाचे पाणी वाहून जाण्याकरितां असणारे नैसर्गिक मार्ग खुले राहतील. मुळांत जर असे नैसर्गिक मार्ग नसतील तर नविन मार्ग तयार करणेची आवश्यकता असल्यास ते तयार करण्यांत येवून त्यातील पाणी सदरच्या रेखांकनाला जवळ असलेल्या नैसर्गिक प्रवाहात सोडण्याची अथवा त्याची पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

९) नियोजित केलेल्या भूखंडात प्रस्तावित केलेल रेखांकन संदर्भात वर उल्लेखिलेल्या शर्तींची पूर्तता करणेत आले नंतरच भूखंड धारकांना महसूल खात्याकडून बांधकाम परवानगी अनुज्ञेय राहील. या आदेशान्वये देण्यांत आलेली रेखांकन मंजूरी व बिनशेती परवानगी म्हणजे नियोजित भूखंडात बांधकामे अनुज्ञेय असा नसून भूखंड धारकांनी स्वतंत्ररित्या बांधकाम नकाशे मंजूर करून घेणे आवश्यक आहे.

१०) बिनशेती दस्ताची **३१/७/२०१३** रोजी संपणा-या मुदतीकरीता हमी राहील. त्यानंतर कोणत्याही सुधारीत दरानुसार बिनशेती दस्त दुरुस्तीसाठी सुधारण्यास पात्र राहील.

११) जर परवानगीधारकाने या आदेशातील अटी विरुध्द कृती केली तर **जिल्हाधिकारी** हे अधिनियमानुसार त्यास होणा-या इतर शिक्षांस बाधा न आणता ते आदेश देतील त्याप्रमाणे परवानगीधारकाने दंड आणि दस्त भरल्यावर सदर जागा ठिकाण अर्जदार ताब्यात ठेऊ शकतील.

१२) रेखांकनामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/अल्प उत्पन्न गटातील (LIG)लोकांसाठी व मध्यम उत्पन्न गटातील लोकांसाठी (MIG) नियोजित केलेल्या भूखंडाची विक्री त्या त्या गटातील .लोकाना करणे अर्जदार यांना बंधणकारक राहील. .उपविभुखंडापैकी किमान ४ व कमाल ६ भुखंडामध्ये रो हाऊसेस पध्दतीने बांधकाम अनुज्ञेय आहभविष्यात कोणतीही तक्रार उदभवल्यास त्यांची जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

१३) **पोच रस्त्याखालील क्षेत्राचे आकारफोडपत्रक झाल्याशिवाय रेखांकनातील निवासी भूखंडात बांधकाम परवानगी अनुज्ञेय नाही.**

१४) अर्जदारानी सादर केलेले कागदपत्र चुकीचे अथवा दिशाभूल करणारे असल्याचे आढळून आल्यास सदर परवानगी रद्द होईल व होणा-या संभाव्य कायदेशीर कारवाईस अर्जदार जबाबदार राहतील.

सही/-**अजित पवार**
अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

प्रति,

१) **श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली** यांच्याकडे मंजूर रेखांकनासह.
२) **तहसीलदार दापोली** यांचे डे पुढील जरुर त्या कार्यवाहीसाठी
३) **उपअधिक्षक , भूमि अभिलेख दापोली** यांजकडे कमी जास्त पत्रकासाठी मंजूर रेखांकनासह.

अपर जिल्हाधिकारी रत्नागिर

क्र.मशा.का.६/एल.एन.ओ/एसआर/तह/ १३/१२
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक -३०/०१/२०१३

वाचले-

अपर जिल्हाधिकारी रत्नागिरी

१) **श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली** यांचा दिनांक ७/६/२०१२ चा अर्ज.
२) **नगर रचनाकार रत्नगिरी** यांचेकडील **जा.क्र.रेखांकन/चिखलगांव./नररत्ना/१४३५ दि.९/७/२०१२**
३) **म.ज.म. (जमिनीचे वापरात बदल व अकृषिक आकारणी) नियम १९६९ पार्ट-२ नियम १६.**
४) **मा. आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. महसूल/का-२/जमीन (२) सीआर-१०३१, दिनांक १५/२/८८ व २९/११/८८.**
५) **उपअधिक्षक,भुमी अभिलेख दापोली** मों.र.नं.१४३/१२ अन्वये रेखांकन मोजणी नकाशे व अर्जदार यांचा दि. २३/११/२०१२ चा अर्ज.
६) **तहसीलदार दापोली** यांचेकडील पत्र **क्र. एलएनए/कावि/३५/१२ दिनांक ३३/०१/२०१२** ने झालेला चौकशी अहवाल.
७) **नगर रचनाकार रत्नागिरी** यांचेकडील **जा.क्र. रेखा/चिखलगांव/नरर/१३०, दि.२२/१/२०१३**पत्र.

आदेश -

मौजे चिखलगांव ता. दापोली ग.ट नं.३९९ व ३९८ मधील १.७८.००हे.आर. जमिनीमध्ये ३१ निवासी भूखंडाचे रेखांकनास परवानगी मिळणेबाबत **श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली** यांनी इकडे अर्ज केलेला आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत नियोजित रेखांकनाचा नकाशा गा.न.नं. ७/१२ चा उतारा, फे. फा. नोंदीचा उतारा, मोजणी नकाशा इत्यादी कागदपत्र सादर केलेले आहेत. अर्जदार स्वत: सदर जमिनीचे कब्जेदार आहेत. अन्य व्यक्तींचा हितसंबंध असल्याचे गा.न.नं. ७/१२ चा उतारा पहाता दिसून येत नाही.

नगररचनाकार रत्नागिरी यांनी त्यांचे **जा.क्र.रेखांकन/चिखलगांव./नररत्ना/१४३५. दिनांक ९/७/२०१२** ने मंजूर केलेल्या रेखांकन नकाशाप्रमाणे उपअधिक्षक भूमि अभिलेख दापोली यांनी प्रत्यक्ष मोजणी करुन नियोजित रेखांकनातील भूखंडाची क्षेत्र निश्चित केली असून त्याप्रमाणे मो.र.नं. १४३/१२ नुसार तयार केलेले रेखांकन मोजणी नकाशे अर्जदार यांनी या कार्यालयाकडे हजर केले आहेत. प्रत्यक्ष मोजणीत सदर क्षेत्र १.७८.०० हे.आर इतके असल्याचे दिसून आले आहे. तेवढया क्षेत्राचा मोजणी नकाशा त्यांनी तयार केलेला आहे.

तहसीलदार दापोली यांनी मंडळ अधिकारी बुरोंडी यांचे मार्फत चौकशी करुन आपला अहवाल सादर केला आहे.

नियोजित रेखांकनास मंजूरी देण्यासाठी ग्रा.पं. चिखलगांव यांनी आवश्यक तो नाहरकत दाखला दिलेला आहे.

भूसंपादन विषयक व लाभक्षेत्रा विषयक मुदतीत प्राप्त झालेल्या दाखल्यानुसार सदर क्षेत्र संपादनाखाली किंवा लाभ क्षेत्रात येत नाही.

मौजे चिखलगांव ता. दापोली ग.ट नं.३९९ व ३९८ मधील १.७८.००हे.आर चे प्रत्यक्ष रेखांकन मोजणीनुसार प्राप्त झालेले क्षेत्र १.७८.०० हे.आर. मध्ये **श्री.अतुल रमेश नवले रा.दापोली** यांनी केलेल्या ३१ निवासी रेखांकन भुखंडास सोबज जोडलेल्या परिशिष्ट प्रमाणे तसेच अटी व शर्तीचे अधिनतेने मंजूरी देण्यात येत आहे.

१) रेखांकनाचा भूखंडाचा वापर केवळ निवासी प्रयोजनासाठी करणेचा आहे. अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी भूखंडाचा वापर बदलावयाचा झाल्यास या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे जरुरीचे आहे.

२) भूखंडाची उपविभागणी करावयाची झाल्यास महसूल खात्याची परवानगी घेणे आवश्यक आहे.

रेखांकनातील कोणताही भूखंड हा प्रत्यक्ष जागेवर १५०.०० चौ.मी.पेक्षा कमी आकारमानाचा असता कामा नये.

४) रेखांकनातील भूखंडामध्ये बांधकाम करणेपूर्वी इमारत विषयक तपशिलवार बांधकाम नकाशे जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडून मंजूर करुन घेणे संबंधित भूखंडधारकावर बंधनकारक आहे.

५) नियोजित रेखांकनातील भूखंडाजवळून महाराष्ट्र राज्य विदयुत मंडळाची उच्च दाबाची विदयुत वाहिनी जात असल्यास सदरच्या विदयुत वाहिनीपासून १५ मीटर पेक्षा कमी अंतरावर इमारतीचे बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

६) रेखांकनातील सर्व नियोजित रस्ते व गटारे अर्जदार यांनी स्थानिक प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे समाधानकारकरित्या समपातळीत आणावयाचे आहेत व बांधावयाचे आहेत. क्षेत्र विनामूल्य हस्तांतरणाबाबतचा प्रतिज्ञालेख अर्जदार यांनी तहसीलदार दापोली यांचे समोर लिहून पूर्ण करुन देवून देखभालीकरिता ग्रा.पं. चिखलगांव यांचे ताब्यात देण्याचे असून त्यासंबंधीचा प्रतिज्ञालेख देखील अर्जदार यांनी स्वखर्चाने तहसीलदार दापोली यांचे समोर पूर्ण करुन देवून त्या संबंधीचा पूर्तता अहवाल तहसीलदार दापोली मार्फत तीन महात इकडे सादर करणेचा आहे.

७) रेखांकनातील खुल्या क्षेत्रापैकी १०% क्षेत्राचा वापर बालवाडी, लायब्ररी, क्लबहॉल इ. सार्वजनिक उपयोगासाठी खूल्या क्षेत्राचे एका कोप-यात फक्त तळमजला असलेली इमारत बांधमन स्थानिक प्राधिकरणाच्या अनुमतीने करता येईल.

८) रेखांकनातील रस्त्याखालील क्षेत्र ०.५६.२५ हे.आर अर्जदार यांनी विनामोबदला स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच ग्रा.पं. चिखलगांवे यांचे ताब्यात देण्याचे असून त्यासंबंधीचा प्रतिज्ञालेख देखील अर्जदार यांनी स्वखर्चाने तहसीलदार दापोली यांचे समोर पूर्ण करुन देवून त्या संबंधीचा पूर्तता अहवाल तहसीलदार दापोली मार्फत तीन महात इकडे सादर करणेचा आहे.

९) रेखांकनातील जमिनीमध्ये नैसर्गिक सांडपाणी व पावसाचे पाणी वाहून जाण्याकरिता असणारे नैसर्गिक मार्ग खुले राहतील. मूळात जर असे नैसर्गिक मार्ग नसतील तर नवीन मार्ग तयार करण्याची आवश्यकता असल्यास ते तयार करण्यात येवून त्यातील पाणी सदरच्या रेखांकनाला जवळ असलेल्या नैसर्गिक प्रवाहात सोडण्याची अथवा त्याची पर्यायी व्यवस्था करण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.